Beed | DAILY | MARATHI | Year-03 | Issue -306 | WEDNESDAY DT.07 FEBRUARY 2024 | RNI-MAHMAR/2021/80074 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

बीड | दैनिक | मराठी | वर्ष -०३ | अंक -३०६ | बुधवार,दि.०७ फेब्रुवारी २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२१/८००७४ | । किंमत ३ रु | । पाने ४




दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# शरद पवार यांना मोठा धक्का, राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्ह अजित पवारांकडे; निवडणूक आयोगाचा निर्णय



मुंबई : राज्याच्या राजकारणातून सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. अवघ्या देशाचे लक्ष लागून राहिलेल्या राष्ट्रवादीतील संघर्षावर निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेतला आहे.

यानुसार राष्ट्रवादी पक्ष आणि घड्याळ चिन्ह हे अजित पवार गटाचेच असल्याची मोठी घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगाने केली आहे. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटासाठी हा सर्वात मोठा धक्का मानला जात आहे.





## या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार

निवडणूक आयोगाने आपला निर्णय जाहीर केल्यानंतर शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले आहेत की, ''निवडणूक आयोगाचा हा निर्णय धक्कादायक आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या हातातून पक्ष हिसकावून घेतला जातोय. देशातील जवळपास सर्वच संविधानिक संस्थांनी स्वायत्तता गमावली असल्याने तर्कहीन निर्णय देऊन तांत्रिक कारणे पुढे केली गेलेली सकृतदर्शनी दिसत आहे.''

शिवसेनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्येही २ जुलै २०२३ ला उभी फुट पडली होती. अजित पवार यांनी सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतल्याने पक्षात दोन गट पडले. ज्यानंतर शरद पवार आणि अजित पवार गटाकडून पक्षावर दावा करण्यात आला. याचबाबत निवडणूक आयोगासमोर सुनावणी सुरु होती. ज्याचा निकाल आज लागला आहे. ज्यात राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्ह निवडणूक आयोगाने अजित पवार गटाला दिला आहे.

जयंत पाटील म्हणाले, ''या निकालाचा सविस्तर अभ्यास करुन आम्ही त्यावर भाष्य करू. या निकालाला आम्ही सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असून देशाचे सर्वोच्च न्यायालय आम्हाला न्याय देईल याची आम्हाला खात्री आहे.''दरम्यान, निवडणूक आयोगाच्या या निर्णयाने अजित पवार गटाकडून जोरदार जल्लोष करण्यात येत आहे. राज्यभरात राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून फटाके फोडून निवडणूक आयोगाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे.



केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादीच्या संघर्षावर मोठा निकाल दिला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने आज मंगळवारी सायंकाळी चिन्ह आणि पक्षाबाबतचा निकाल अजित पवार गटाच्या बाजूने दिला आहे. आयोगाचा निकाल हा शरद पवार गटाला मोठा धक्का मानला जात आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निकालावर शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. 'अजित पवारांना पक्ष आणि चिन्ह मिळवून देण्यात अदृश्यशक्तीचा हात, अशी प्रतिक्रिया खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली आहे.

खासदार सुप्रिया सुळे यांनी दिल्लीत माध्यमांशी संवाद साधला. यावेळी सुळे यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निकालावर पहिली प्रतिक्रिया दिली आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या, 'अदृश्यशक्ती त्यांचं हे यश आहे. कारण ज्या व्यक्तीने पक्ष स्थापन केला. त्यांचा हातातून पक्ष काढून घेणे हे पहिल्यांदा झालं असेल. मला काही आश्चर्य वाटत नाही. कारण हे अपेक्षित होतं. हे महाराष्ट्राच्या विरोधात षडयंत्र आहे.

# ओबीसींचा स्वतंत्र राजकीय पक्ष

## नाव अन् घटनेचा अभ्यास करण्यासाठी १५ सदस्यीय समिती स्थापन, प्रकाश शेंडगे यांची घोषणा

प्रतिनिधी @ मुंबई

ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी ओबीसींच्या स्वतंत्र पक्षाची घोषणा केली आहे. अधिकार असतानाही सत्तेचा वाटा आमच्यापर्यंत येऊ दिला नाही. त्यामुळे पक्ष स्थापन करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय आमच्यापुढे नव्हता. ओबीसींच्या पक्षाचे नाव व घटनेच्या अभ्यासासाठी एक १५ सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली आहे. या समितीच्या अहवालानंतर पक्षाचे नाव घोषित केले जाईल, असे ते म्हणालेत.प्रकाश शेंडगे म्हणाले की, महाराष्ट्रात ओबीसी आरक्षणाचे तीन तेरा वाजताना आपण पाहत आहोत. मराठा समाजाने सत्तेच्या माध्यमातून सत्तेवर दबाव टाकून आमच्या आरक्षणाचा सत्यानाश केला आहे. ओबीसी भटके मुक्त, मागासवर्गीय समाज आणि सर्व मिळून आपले राज्य आणायचे



असे ठरले आहे. यासाठी राजकीय पक्ष काढण्याचा ठराव मंजूर झाला आहे. आता ही आरक्षणाची लढाई राजकीय लढाई म्हणून येऊन ठेपली आहे.प्रकाश शेंडगे म्हणाले की, स्वत:च सरकार यासाठी आम्ही हे पाऊल उचलेले आहेत. लोकसभेसाठी आमचे सर्वच मतदारसंघात आम्ही उमेदवार उभे करणार आहोत. आता ओबीसींना तिकीटासाठी वणवण फिरावे लागणार नाही. छगन भुजबळ हे एका मोठ्या पक्षाचे नेते आहेत, त्यांनी पक्ष सोडून लगेच बाहेर पडावे असे आम्ही म्हणणार नाही, असेही यावेळी त्यांनी स्पष्ट केले आहे.ओबीसी आणि भटके विमुक्त समाज आमच्या पाठिशी आहे. छगन भुजबळ हे नगरसेवक ते उपमुख्यमंत्री असा प्रवास केला आहे त्यावर मनोज जरांगे यांनी टीका करणे चुकीचे आणि वास्तववादी नाही. ओबीसींच्या भावनासाठी आम्ही पक्ष स्थापन केला आहे.



# वाळू घेऊन जाणारा ट्रक पथकाने पकडला

## ट्रकसह ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी @ केज

कळंबकडे ( जि. धाराशिव ) वाळू घेऊन चाललेला ट्रक पोलिस अधीक्षकांच्या पथकाने सोमवारी पहाटे युसूफवडगाव ( ता. केज ) ठाण्याच्या हद्दीत पकडला. ट्रकचालक व ट्रकसह ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, पोलिसांनी पुढील कारवाई संदर्भात महसूलला पत्र दिले आहे.केज तालुक्यातील युसूफवडगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतून कळंबकडे वाळू घेऊन ट्रक जात असल्याची माहिती पोलिस अधीक्षकांच्या पथकास मिळाली. ही माहिती मिळताच पोलिस अधीक्षकांचे पथक प्रमुख गणेश मुंडे यांच्या पथकाने सोमवारी पहाटे हा १२ टायरचा ट्रक पकडला. ट्रक चालकास ताब्यात घेऊन पोलिसांनी ट्रकसह ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# मध्यप्रदेशातील फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट: ११ जणांचा मृत्यू

## १०० हून अधिक जखमी; रस्त्याच्या कडेला पडले मृतदेह

प्रतिनिधी @ भोपाळ

हरदा येथील अवैध फटाका कारखान्यात स्फोट झाला. त्यामुळे आजूबाजूच्या १०० हून अधिक घरांना आग लागली. यामध्ये ११ जणांचा मृत्यू झाला. तर १०० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. कारखान्याच्या आजूबाजूला रस्त्यावर काही मृतदेह पडले आहेत. २५ हून अधिक जखमींना हरदा जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. प्रशासनाने १०० हून अधिक घरे रिकामी केली आहेत. स्फोटामुळे वाहनांसह अनेक पादचारी दूर फेकले गेले. कारखान्यात अधूनमधून स्फोट होत असल्याचे सांगितले जात आहे.

मगरधा रोडवरील बैरागढ गावात कारखाना आहे. मंगळवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास कारखान्यात एवढा भीषण स्फोट झाला की संपूर्ण शहर हादरले. आगीने उग्र रूप धारण केले. त्यामुळे परिसरात गोंधळाचे वातावरण आहे. कारखान्यातून उठणाऱ्या ज्वाळा आणि धुराचे लोट दूरवरून दिसत होते. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी रवाना झाल्या आहेत. आगीचे कारण



सध्या समजू शकलेले नाही. हरदा आणि आसपासच्या जिल्ह्यातून सुमारे ११४ रुग्णवाहिका रवाना करण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री डॉ. मोहन यांनी मंत्रालयात तातडीची बैठक बोलावली हरदा येथील फटाका कारखान्यात झालेल्या दुर्घटनेची मुख्यमंत्री डॉ.मोहन यादव यांनी तातडीने दखल घेतली आहे. त्यांनी कॅबिनेट मंत्री श्री उदय प्रताप सिंह, -उड श्री अजित केसरी, ऊऋ होमगार्ड यांना तातडीने हेलिकॉप्टरने हरदा येथे जाण्याच्या सूचना दिल्या आहेत. जवळपासच्या शहरांमधून छऊळऋ, डऊळऋ आणि अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका पाठवल्या जात आहेत. मुख्यमंत्री डॉ. यादव यांनी भोपाळ, इंदूर येथील वैद्यकीय महाविद्यालय आणि एम्स भोपाळमधील बर्न युनिटला जखमींवर उपचारासाठी आवश्यक तयारी करण्याचे निर्देश दिले आहेत. जखमींवर उत्तम उपचार हे आमचे पहिले प्राधान्य असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. तसेच मुख्यमंत्री डॉ.मोहन यादव यांनी मंत्रालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन घटनेच्या स्थितीबाबत माहिती घेतली व आवश्यक निर्देश दिले.

# दोन किलोमीटरची रॅली काढत ठेवीदार धडकले जिल्हाधिकारी कार्यालयावर

## ज्ञानराधा १५ फेब्रुवारीपासून, तर साईराम दोन दिवसांत ठेवी देणार

प्रतिनिधी @ बीड

जिल्ह्यातील मल्टिस्टेटमध्ये अडकलेल्या ठेवी परत मिळण्यासाठी सोमवारी सकाळी ११.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून ठेवीदारांनी मोर्चा काढला. हा मोर्चा दुपारी १२.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. त्या ठिकाणी नगर रोडवर ठेवीदारांनी ठिय्या मांडला. दोन वाजता उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, पोलिस उपअधीक्षक संतोष वाळके आंदोलनस्थळी आले. मात्र, त्यांच्याकडे ठोस आश्वासन नसल्याने आंदोलकांनी त्यांना परत पाठवले.

दुपारी तीन वाजता पुन्हा संतोष वाळके यांनी ज्ञानराधा आणि साईनाथ मल्टिस्टेटच्या अध्यक्षांना फोन करून आंदोलकांशी बोलणे करून दिले.



ज्ञानराधा १५ तारखेला ठेवी वाटप सुरू करणार आहे, तर साईराम मल्टिस्टेट दोन दिवसांत टप्प्याटप्प्याने ठेवी देणार असल्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलक दुपारी ३.३० वाजता नगर रोडवरून उठले. त्यानंतर हे आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले आहे.जिल्ह्यातील ज्ञानराधा, साईराम, राजस्थानी, जिजाऊ, माताश्री, लक्ष्मीमाता, मराठवाडा अर्बन या मल्टि स्टेटमध्ये बीडसह राज्यातील ठेवीदारांचे पैसे अडकले आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांच्या दारात बसलेले आंदोलक उपजिल्हाधिकारी यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतरही उठायला तयार नव्हते. तेव्हा पोलिस उपअधीक्षक संतोष वाळके यांनी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या फोनवरून सुरेश कुटेंना संपर्क साधत ठेवीदार आणि उबाळे यांच्याशी बोलणे करून दिले. कुटे म्हणाले की, संपूर्ण नियोजन झाले आहे. सहा दिवसांत कॅश हातात येणार असून आपण ठेवी वाटप करत आहोत, असे आश्वासन दिले. तसे पत्रही संचालकांनी आंदोलकांना दिले.

# जिल्हा परिषदमध्ये २१६७८ शिक्षकांची भरती

प्रतिनिधी @ बीड

राज्यातील हजारो पात्रताधारकांचे लक्ष लागलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेच्या जाहिराती पवित्र संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. एकूण २१ हजार ६७८ पदांसाठी प्रक्रिया राबवली जाणार आहे. सर्वाधिक पदे जिल्हा परिषद शाळांतील असून, खासगी अनुदानित, महापालिका, नगरपालिका, नगर परिषद शाळांचा समावेश आहे. शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी ही माहिती दिली. स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी अनुदानित शाळांतील पहिली ते बारावीच्या शिक्षक पदांसाठी भरती प्रक्रिया राबवण्यात येत आहे. एकूण रिक्त जागांच्या ८० टक्के जागांवर भरती प्रक्रिया करण्याचे नियोजित आहे. शिक्षक पदांसाठीच्या बिंदूनामावली जून ते नोव्हेंबर या कालावधीत तपासणी करण्यात आली. मात्र बिंदूनामावलीबाबत विधीमंडळात प्रश्न उपस्थित करण्यात आल्याने जिल्हा परिषदांच्या १० टक्के जागा राखून ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांतील ७० टक्के पदांवर पदभरती केली जाणार आहे. त्या जागांबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेतला जाणार आहे. शासन निर्णय आणि शासनाचे विविध विषयांवरील धोरण याचे तंतोतंत पालन करून भरतीप्रक्रिया राबवली जात असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

पवित्र संकेतस्थळावर जाहिरातीची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर ३४ जिल्हा परिषदांतील १२ हजार ५२२ पदे, १८ महापालिकांतील २ हजार ९५१ पदे, नगरपालिकांतील ४७७, नगरपरिषदांतील १ हजार १२३, खासगी अनुदानित ५ हजार ७२८ जागांची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यात मुलाखतीशिवाय १६ हजार ७९९ जागांवर, तर मुलाखतीसह ४ हजार ८७९ जागांवर भरती केली जाणार आहे.



उमेदवारांना पसंतीक्रम नमूद करण्याची सुविधा ८ फेब्रुवारीपासून उपलब्ध करून दिली जाणार आहे. उमेदवारांनी पदनिहाय पसंतीक्रम नमूद करून ९ फेब्रुवारीपर्यंत निश्चित करणे आवश्यक आहे. पदभरतीसाठी उमेदवारांची प्राधान्यक्रमाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्याबाबतचे वेळापत्रक लवकरच प्रसिद्ध केले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

# हत्तीखान्याच्या लेण्यांचा होणार जीर्णोद्धार

## २ कोटी ४९ लाखांच्या निधीला मान्यता,पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे आदेश



अंबाजोगाई : शहर परिसरातील ऐतिहासिक ठेवा असलेला हत्तीखान्यातील (जोगाई सभामंडप) लेण्यांचे जतन व दुरुस्तीसाठी राज्य शासनाने २ कोटी ४९ लाख ८४ हजार रुपयांच्या निधीला मान्यता दिली आहे. या बाबतचे परिपत्रक पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने सोमवारी (ता.५) जाहीर करण्यात आले.छत्रपती संभाजीनगर येथे (ता.१६) सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाची विशेष बैठकीत मराठवाड्यातील प्रलंबित विकास कामाबाबत चर्चा होऊन निर्णय झाला होता. त्यात मराठवाड्यासह अंबाजोगाई येथील प्राचीन वास्तुस्थळाचा विकास करण्याबाबत घोषणा करण्यात आली होती.या निर्णयानुसार अंबाजोगाई परिसरातील जोगाई सभामंडप लेणी (हत्तीखाना) या राज्य संरक्षित स्मारकाचे जतन व दुरुस्तीचा येथील परिचय आर्किटेक्ट यांनी तयार केलेले अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेकरीता पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाकडे सादर केले होते. त्यानुसार या राज्य संरक्षित स्मारकाचे जतन व दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.या प्रस्तावानुसार जोगाई सभामंडप लेणी (हत्तीखाना) संरक्षित स्मारकाच्या जतन दुरुस्तीच्या कामास दोन कोटी ४९ लाख ८४ हजार ४६५ रुपये इतक्या निधीला शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. या कामासाठी संचालक, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित केले असून, पुरातत्वीय निकषानुसार याचे काम पूर्ण होईल. याची जबाबदारी संचालक, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय व संबंधित संवर्धन वास्तुविशारद यांची राहील. असे या आदेशात म्हटले आहे.

संपादकीय

## संमेलनाची पुरती 'शोभा'

एका संमेलनाच्या अध्यक्षीय पाहुण्याला दुसऱ्या संमेलनात हाताला धरून 'चला चला' म्हणत बाहेर काढणे हे सुद्धा शोभादायक नव्हते. प्रस्थापित आणि विद्रोही ही केवळ वैचारिक मांडणी आहे, दोन्ही प्रवाह एकमेकांचे शत्रू नव्हेत याचे भान ठेवणे आवश्यक होते.

अमळनेर येथील ९७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणावर आणि उद्घाटनावर 'महाराष्ट्र टाइम्स'ने लिहिलेल्या अग्रलेखात 'भाकरी फिरवण्याची' व्यक्त केलेली निकड किती खरी आणि आवश्यक आहे, ते संमेलनाच्या पुढील दोन दिवसांत अधिकच प्रकर्षाने दिसून आले. या पार्श्वभूमीवर कोणत्याही सरकारी मदतीशिवाय, अमळनेरमध्येच झालेले विद्रोही साहित्य संमेलन हे तुलनेने अधिक शिस्तबद्ध आणि गर्दी जमवणारे होते, याची नोंद घेणेही आवश्यक आहे.

'विद्रोही' संमेलनातील सहभागींचा उत्साह मंडपाबाहेर रस्त्यावरही ओसंडून वाहात असल्याचे दिसत होते. अ. भा. संमेलनात मात्र श्रोत्यांविना सुनासुना मुख्य सभामंडप, वाचकांच्या प्रतिक्षेतील पुस्तकांची दालने, राहण्याची, जेवणाची अव्यवस्था, या अव्यवस्थेबाबतची अनास्था असे चित्र सगळीकडे दिसत होते. या संमेलनाची जागा चुकली की नियोजन चुकले, आयोजकांची क्षमता कमी पडली की साहित्य महामंडळाचे दुर्लक्ष भोवले, यावर आता गांभीर्याने चर्चा झाली पाहिजे. मुळात वर्ध्याच्या संमेलनाबाबतही अशाच तक्रारींचा पाढा वाचला गेला होता, तरीही यावेळी या प्राथमिक सोयींबाबत तेवढेच किंबहुना अधिक दुर्लक्ष झाले, हे निषेधार्ह आहे. संमेलनातील सहभागाची एकदा फोनवर खातरजमा झाल्यावर केवळ पत्र पाठविण्याची औपचारिकता पाळली गेली. संबंधित वक्त्याची संमेलनस्थळी काय व्यवस्था केली आहे, हे सांगणारा साधा फोनही आयोजकांनी केला नाही, अशा तक्रारी काही वक्ते करत होते. साहित्याच्या आणि साहित्यिकांच्या प्रेमापोटी रसिकांनी यावे आणि सगळे सहन करावे, असे साहित्यिक मराठीत आता फार राहिलेले नाहीत. त्यांना समक्ष भेटण्याची, बोलण्याची एकेकाळी उत्सुकता असे, ती समाजमाध्यमांनी संपवून टाकली आहे. रसिकांना संमेलनात आता प्रामुख्याने आकर्षण असते ते परिसंवाद, मुलाखती ऐकण्याचे. परंतु असे परिसंवाद, कवी संमेलने, मुलाखती यात भाग घेणाऱ्यांच्या योग्यतेऐवजी राज्याच्या प्रत्येक भागाला प्रतिनिधित्व मिळावे या हट्टातून कार्यक्रमांचा दर्जा जमीनदोस्त झाला असल्याचे चित्र यावेळी दिसत होते.

'प्राध्यापक' वर्ग हा एकेकाळी अभ्यासू, विषयाची सुस्पष्ट मांडणी करणारा असे. मात्र त्यांना मुळात परिसंवादाच्या विषयाचे आकलनच झालेले नाही, हे काही ठिकाणी दिसून येत होते. एकूण सामाजिक-सांस्कृतिक रसिकत्वाचा दर्जा आणि प्राध्यापकांचा दर्जा यांची पातळी सारखीच खाली आली आहे, असे समाधान मानायचे असेल तर गोष्ट वेगळी. भर म्हणून सरकारच्या वैचारिक कलाचे प्रतिबिंबही विषयांच्या आणि व्यक्तींच्या निवडीत पडलेले लक्षात येत होते. अशा वैचारिक बांधिलकीतून निवड झाली की अनेकदा असलेले कर्तृत्वही दुय्यम ठरते, अथवा झाकोळले जाते. गिरीश प्रभुणे यांनी मुलाखतीत जातपंचायत व्यवस्थेची केलेली भलामण पाहता, संमेलन वैचारिक औदार्याकडून खुजेपणाकडे जात आहे की काय, अशी शंका कुणालाही यावी. ठरलेल्या ठरावांमध्ये कपात किंवा काटछाट केली गेली हे ही संमेलनासाठी चांगले चिन्ह नव्हे. संमेलनात डझनभर परिसंवाद होते, परंतु त्यातील एकाच परिसंवादाची सहभागींच्या छायाचित्रांसह माहिती देणारे संमेलनस्थळी लागलेले फलक बहुधा संबंधितांनी स्वखर्चाने लावले असावे. संमेलन जिल्ह्याच्या ठिकाणी घेतले तर गर्दी होईल, इतपत सोपा आणि सुलभ मार्ग शोधणाऱ्यांचेही कौतुक करावे लागेल. खरी तक्रार गर्दीबाबत नसून एकूणच औदासिन्य, ढिसाळपणा आणि अव्यवस्थेबद्दलची आहे, याकडे सोयिस्कर कानाडोळा करण्याचा हा प्रयत्न म्हणता येईल. निवडणुकीच्या माध्यममातून ज्यांना अध्यक्षीय सन्मान मिळू शकणार नाही, किंवा या प्रक्रियेत ज्यांना स्वारस्य नाही, अशांना अध्यक्षपद मिळावे यासाठी निवडणूकीऐवजी निवडीची पद्धत आणली गेली. यातून फार काही साध्य झाले आहे असे दिसत नाही. यावेळचे अध्यक्ष रवींद्र शोभणे यांनी काय विचार मांडला किंवा आधीच्या अनेक भाषणांपेक्षा काय वेगळे सांगितले असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर देणे अवघड आहे.

# देशाला शक्तिशाली बनविण्याचे काम संघभावनेतून होते- न्यायाधीश सुहास दबडगावकर

### श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलन बक्षीस वितरण समारंभ

माजलगाव ।प्रतिनिधी

येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलनात बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी पुणे औद्योगिकी न्यायालयाचे न्यायाधीश सुहास दबडगावकर बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की, खेळ, नृत्य यांच्या सादरीकरणातून एकसंघ संघटन निर्माण होते याच एक संघभावनेतून देश शक्तिशाली बनवु शकतो. हे सर्व गुण शालेय जीवनात स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या अंगी बिंबवले जातात, पुढे बोलताना ते म्हणाले की शेतकरी व गुरुजन हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, शेतकरी बीयांची रुजवण करुन चांगली मशागत करून उत्तम पिकांचे उत्पादन करतो व गुरुजन विद्यार्थ्यांची बौद्धिक, माणसिक मशागत करून उत्तम नागरिक घडविण्याचे काम करतात.

स्नेहसंमेलनाच्या बक्षीस वितरण समारंभाची सुरुवात संमेलन गीत, दिपप्रज्वलन, माता सरस्वती व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पूजन करून झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ हेमंत वैद्य तर व्यासपीठावर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड, श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह अड विश्वास जोशी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले सर, स्नेहसंमेलन प्रमुख आदिनाथ कुंडकर, सहसंमेलन प्रमुख शिवशंकर भंडारे, विद्यार्थीनी प्रतिनिधी कु सुमेधा कुलकर्णी, विद्यार्थी प्रतिनिधी चि लक्ष्मीकांत गवते इत्यादी उपस्थित होते.यावेळी क्रिडा विभागाने कवायतीचे प्रात्यक्षिके, भरतनाट्यम, महाराष्ट्राची लोकधारा स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त संघाच्या गीतांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच मराठी विषय व ज्ञानोपासक मंडळाच्या 'ज्ञानज्योत' व संगीत विभागाच्या 'स्वानंदी' या अंकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यानंतर सर्व मंडळांतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेतील प्रथम क्रमांक प्राप्त विजेत्यांना पारितोषिके देऊन



गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मुख्याध्यापक अनंतराम कोपले सर यांनी शाळेत अभ्यासक्रमाबरोबर विद्यार्थ्यांच्या पंचप्राण (पंचकोश) विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्व उपक्रम घेतले जातात यामधून मन,मनगट व मस्तक यांना बळकटी मिळते. बक्षीस वाचन क्रीडाध्यापक पंडित मेंडके, प्रभाकर बनसोडे यांना केले. आभार पर्यवेक्षक सदाशिव ढगे, संमेलन गीत चैतन्य आहेर व गीत मंचाने सादर केले, सुत्रसंचलन श्रीमती अपर्णा मुळे यांनी केले तर कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली कल्याण मंत्र विजयकुमार सोन्नर यांनी सांगितला.

## माता रमाई आंबेडकर जयंती निमित्त मौजे शिवणी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन

बीड ।प्रतिनिधी

माता रमाई आंबेडकर जयंती निमित्त मौजे शिवणी ता. जि. बीड येथील महाविहार धम्मभूमी, डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर येथे दि.०७ फेब्रुवारी २०२४ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास धम्मप्रेमी, उपासक, उपासिका यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मुख्य संयोजक पु. भिक्खु धम्मशील थेरो ,बीड.( सचिव प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था, बीड.) यांनी केले आहे.

प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था, बीड, माता रमाई आंबेडकर जयंती उत्सव समिती,बीड., व सर्व बौध्द उपासक - उपासिका यांच्या वतीने प्रतिवर्षा प्रमाणे दिनाक ०७ फेब्रुवारी २०२४ रोजी. माता रमाई आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंती उत्सवाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमासह माता रमाई यांच्या जिवन कार्यावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार दि. ७ फेब्रुवारी रोजी दुपारी ०१.०० वा. प्रमुख व्याख्यात्या मायाताई दिवान (राजर्षी शाहू कन्या शाळा, बीड) यांचे व्याख्यान होणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रो. डॉ. जयश्री शिंदे (सामाजिक कार्यकर्त्या/आरोग्य सल्लागार, बीड) या उपस्थित राहणार आहेत. यावेळी त्यागमूर्ती रमाई पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे.



सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या ५ महिलांचा त्याग मूर्ती रमाई पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच परिसरातील गरीब, गरजू व होतकरू मुलांना मोफत शालेय साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. यावेळी भोजनदान जयश्री विकास डोंगरे यांच्या कडून देण्यात येईल तर खिरदान अरविंद कोरडे यांच्या कडून देण्यात येणार आहे. तरी सर्व या कार्यक्रमास धम्मप्रेमी, उपासक, उपासिका यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था, बीड व माता रमाई आंबेडकर जयंती उत्सव समिती बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## 'नाट्यकलेचा जागर'मध्ये एकांकिका, नाट्यछटा, नाट्य अभिवाचन स्पर्धा

### आज स्पर्धेस स्पर्धक, रसिकांनी उपस्थित रहावे - डॉ. दीपाताई क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

येथील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्यावतीने घेण्यात येणाऱ्या 'नाट्यकलेचा जागर' हा स्पर्धा महोत्सव बीडमध्ये दि.७ आणि ८ फेब्रुवारी रोजी होणार आहे. यात एकांकिका, नाट्य अभिवाचन, नाट्यछटांच्या स्पर्धा होणार असल्याची माहिती स्पर्धा प्रमुख तथा बीड नाट्य परिषदेच्या अध्यक्ष डॉ.दीपा क्षीरसागर, डॉ. संजय पाटील देवळाणकर यांनी दिली आहे.



१०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनानिमित्त विभागीय नाट्य संमेलन व नाट्यकलेचा जागर संपूर्ण महाराष्ट्रात होत आहे. नाट्यकलेचा जागरच्या स्पर्धेचा पहिला टप्पा बीड येथील विभागीय नाट्य संमेलनाच्या अगोदर झाला. दुसऱ्या टप्प्यात दि.७ आणि ८ फेब्रुवारीला १५ एकांकिका होतील. तसेच, ७ फेब्रुवारीला १६ नाट्य अभिवाचन तर ८ फेब्रुवारीला २३ नाट्यछटांच्या स्पर्धा होणार आहे. सर्व स्पर्धकांनी सां.के .एस.के महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सहभागृहामध्ये सकाळी १० वाजता उपस्थित राहावे. रसिकांनी या स्पर्धेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बीड नाट्य परिषदेच्या बीड शाखाध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांनी केले आहे.

# बीड जिल्ह्यात दुष्काळी उपाय योजना तात्काळ लागू करा, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर

**उद्धव बाळासाहेब ठाकरे बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांचे शेतकऱ्यांच्या विविध विषयांवर मा. जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे मॅडम यांना निवेदन सादर. बीड जिल्हा सह संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती असल्याने बीड जिल्हा दुष्काळ ग्रस्त जाहीर करून दुष्काळी उपाय योजना लागू करण्यात याव्या या बाबतीचे निवेदन शिवसेना बीड जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या हस्ते व युवा सेनेचे जिल्हा युवा अधिकारी गजानन कदम दुसरे जिल्हा युवा अधिकारी रविराज बडे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख हनुमान जिजा जगताप,जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, पाटोदा तालुका प्रमुख मुकूंद शिंदे, आष्टी तालुका प्रमुख सुभाष राऊत, आष्टी युवासेना शहर प्रमुख शिवप्रसाद जाधव, उपतालुकाप्रमुख अशोक पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत माननीय जिल्हाधिकारी दीपा मुधोळ,मुंडे मॅडम यांना देण्यात आले.**

बीड जिल्ह्यामध्ये पिण्याच्या पाण्याची भिषण पाणी टंचाई असल्याने माणसांना पिण्याचे पाणी व जनावरांना चारा आणि पाण्याची अत्यंत टंचाई परिस्थिती निर्माण झाल्याने बीड जिल्हा दुष्काळ ग्रस्त जाहीर करून दुष्काळी उपाय योजना लागू करण्यात याव्यात.

१.गुरांच्या चारा छावण्या तात्काळ सुरू करण्यात याव्या.

२.टंचाई गस्त भागात पिण्याच्या पाण्याचे टँकर तात्काळ सुरू करण्यात यावे.


३.सध्या शेतक-यांचे नगदी पीक कापुस घरामध्ये पडुन असल्याने शासकीय खरेदी करून प्रती क्विंटल १० हजार रुपये प्रमाणे भाव दयावा.

४. सोयाबीनला भाव वाढ देऊन प्रती क्विंटल ८ हजार रुपये प्रमाणे भाव दयावा.

५.प्रलंबीत पीक विमा आनुदान देण्यात यावेत.

६.वन्यप्राण्यापासुन होणारे नुकसान भरपाई तातडीने देण्यात यावे

७.बीड जिल्हा दुष्काळ ग्रस्त जाहीर करून



सर्व उपाय योजना तात्काळ लागू कराव्यात

नसता शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी दिला..!!



## राष्ट्रवादी दादांकडे

आयोगानं दिलं घड्याळ..
काय येऊन ठेपली वेळ ?
साहेबांवर कठीण काळ !

कष्टानं बांधलेल्या घरातून,
कुटुंबप्रमुखच काढला बाहेर..
ज्यांना शिकवलं बोट धरून,
त्यांनीच दिला घरचा अहेर !

आधी गेला धनुष्यबाण,
आता घड्याळाची पाळी..
लोकशाहीची नवी व्याख्या,
जो बळी तो कान पिळी !

चाललयं तरी काय देशात,
सोकवणार भविष्यात काळ..
नाही ऐकू येणार टिकटिक,
पाडले जाईल बंद घड्याळ !!

-राजेंद्र काळे
बुलडाणा ९८२२५९३९२३

# कै. निळकंठ जाधव स्मृती प्रित्यर्थ छत्रपती शिवाजी विद्यालयाला ड्युअल डेस्क भेट

माजलगाव ।प्रतिनिधी

येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक कै. निळकंठ जाधव यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या कुटुंबीयांनी छत्रपती शिवाजी विद्यालयाला ३० ड्युअल डेस्क भेट दिले. कै. निळकंठ जाधव हे वीस वर्षे छत्रपती शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक होते. त्यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त त्यांच्या पत्नी प्रा. संगीता जाधव, मुले निखिल जाधव, स्वयम जाधव यांनी छत्रपती शिवाजी विद्यालयाला ड्युअल डेस्क भेट देऊन त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. मुख्याध्यापक कै. निळकंठ जाधव यांनी छत्रपती शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून अतिशय उत्कृष्ट कार्य केले. शाळेच्या विकासामध्ये त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. त्यांच्या कुटुंबीयांनी शाळेला ड्युअल डेस्क दिल्यामुळे त्यांचे विद्यार्थ्यांप्रति प्रेम व्यक्त झाले आहे, अशी भावना संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार राधाकृष्ण पाटील यांनी व्यक्त केली. याबद्दल संस्थेचे सचिव माजी नगराध्यक्ष अशोक होके पाटील, डॉ. योगिता होके पाटील, अभय होके



पाटील, मुख्याध्यापक मनोज सोळंके, भास्कर पारगावकर, बालासाहेब झोडगे, आप्पासाहेब होके, अशोक रोडगे, विष्णु गडकर, माधव घोलप, पद्माकर शिंदे, अनंत शेजुळ, सुरेश सोळंके, दत्ता इंगळे, सत्यप्रिया होके पाटील, तुळशीराम साळवे, ज्ञानेश्वर पवार, पंकज कळसकर, शेख शहाणूर, अमर राऊत, अविनाश जाधव, दत्ता पांडे, दिनकर काळे यांनी धन्यवाद दिले.




## जिल्हा विभागीय रोलर स्केटिंग स्पर्धेत तुलसी इंग्लिश स्कूलच्या अरसलान खान पठाणला कांस्य पदक

बीड ।प्रतिनिधी

जिल्हा विभागीय रोलर स्केटिंग स्पर्धेत तुलसी इंग्लिश स्कूल बीडच्या अरसलान खान पठाण याने कांस्य पदक पटकावून तिसरा क्रमांक मिळविला आहे. या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात असून देवगिरी प्रतिष्ठान बीडचे संस्थापक अध्यक्ष तथा तुलसी शैक्षणिक समूहाचे प्रमुख प्रा. प्रदीप रोडे यांनी अरसलान याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

टीम स्केटिंग अकादमी आयोजित जिल्हा विभागीय रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप ओपन डिव्हिजन स्केटिंग चॅम्पियनशिप २०२४ चे आयोजन अहमदनगर येथे शुभम कर्पे आणि प्रमोद डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली ४ फेब्रुवारी रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेत तुलसी इंग्लिश स्कूल बीड येथील युकेजी वर्गातील विद्यार्थी अरसलान खान पठाण याने रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप २०२४ मध्ये कांस्य पदक पटकावून तिसरा क्रमांक मिळविला आहे. त्याच्या या यशाबद्दल तुलसी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या उमा जगतकर तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी पठाण याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# राष्ट्रवादीच्या युवक मेळाव्यात रोजगाराचा मुद्दा केंद्रस्थानी असावा -डॉ.योगेश क्षीरसागर

## बीड जिल्ह्यातून सर्वाधिक युवक मेळाव्याला येतील -दत्ता भांगे
## बीडमध्ये राष्ट्रवादी युवक काँग्रेसची जिल्हास्तरीय आढावा बैठक उत्साहात

बीड ।प्रतिनिधी

पुण्यात बालेवाडीत येत्या ११ फेब्रुवारीला राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा भव्य युवक मेळावा होत आहे. तो मेळावा यशस्वी होईल यात किंचितही शंका नाही. त्या मेळाव्यात रोजगाराचा मुद्दा केंद्रस्थानी असावा, असे मत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले. तसेच, पुण्यातील मेळाव्याला बीड जिल्ह्यातून सर्वाधिक युवक मेळाव्याला हजर राहतील, असा विश्वास युवकचे मराठवाडा अध्यक्ष दत्ता भांगे यांनी व्यक्त केला.




बीडमध्ये राष्ट्रवादी युवक काँग्रेसची जिल्हास्तरीय आढावा बैठक मंगळवारी (दि.६) उत्साहात पार पडली. यावेळी युवकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.व्यासपीठावर डॉ. क्षीरसागर, भांगे यांच्यासह जिल्हा निरीक्षक सचिन मिसाळ, युवक जिल्हाध्यक्ष विजयसिंह उर्फ बाळा बांगर, सरपंच ड.राजेंद्र राऊत, जिल्हा उपाध्यक्ष उमेश पोखरकर, जिल्हा सरचिटणीस रवी आघाव, नगरसेवक इलियास मेंबर, विद्यार्थी आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष शारेक जकेरिया, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, इंजि.अजिंक्य आनेराव, सफवान खान, सोशल मीडिया सेलचे जिल्हाध्यक्ष सुशांत राऊत, रोहित गायकवाड यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. योगेश क्षीरसागर म्हणाले, राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, कृषिमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही पक्षात आल्यापासून संघटन मजबूत करत आहोत. येत्या आठ दिवसांत बीड मतदारसंघात सर्व आघाड्यांचे पद कार्यकर्त्यांना दिले जाणार आहेत. सक्रिय कार्यकर्त्यांना संधी दिली जाईल. पदे घेऊन काम न करणाऱ्यांना आढावा घेऊन हटविले पाहिजे, त्याशिवाय पदाधिकारी सक्रियपणे जबाबदारी पार पाडणार नाहीत. तसेच, विद्यार्थी, युवकांनी राजकारणासोबत उद्योग, व्यवसायाकडे लक्ष दिले पाहिजे. केंद्र व राज्य शासनाकडून रोजगार मेळावा होणार असून त्यातून २ लाख रोजगार निर्मिती होणार आहे. तसे झाल्यास युवकांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल. शासनाच्या अनेक योजना आहेत, त्यापासून कार्यकर्ते अनभिज्ञ आहेत. योजनांची जनजागृती व्हावी. शासनाच्या धर्तीवर पक्षाने सुद्धा रोजगार मेळावे घ्यावेत, असे मत डॉ. योगेश क्षीरसागर यांनी मांडले. दत्ता भांगे म्हणाले की, राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे नेतृत्व आठरापगड जातीला सामावून घेणारे नेतृत्व आहे. राष्ट्रवादीने कधीही पुरोगामी विचार सोडलेला नाही. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी युवकचे संघटन मजबूत होते आहे. पुण्यात होणाऱ्या मेळाव्याला जिल्हानिहाय निवास, भोजन व्यवस्था करण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातून सर्वाधिक युवक मेळाव्याला येतील, असा विश्वास मराठवाडा अध्यक्ष दत्ता भांगे यांनी व्यक्त केला. तसेच, लोकसभा निवडणुकीला थोडाच अवधी शिल्लक असून त्याअनुषंगाने युवकांनी कामाला लागावे, असे आवाहन देखील त्यांनी केले. इंजि.अजिंक्य आनेराव यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक युवक जिल्हाध्यक्ष बाळा बांगर यांनी केले. सूत्रसंचलन शहराध्यक्ष सचिन जाधव यांनी केले. आभार जिल्हा उपाध्यक्ष सलिम शेख यांनी मानले. या बैठकीस राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा, तालुकास्तरीय पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बीड जिल्हा राष्ट्रवादीचा कायम बालेकिल्ला राहणार - सचिन मिसाळ

बीड जिल्हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला आहे. तो कायम राहावा यासाठी युवक आघाडीने परिश्रम घेतले पाहिजेत. बीड जिल्ह्यात कार्यकर्त्यांनी संघटनशक्ती वाढवू. पक्षीय जबाबदार चोख पार पाडावी. युवक मेळाव्याला बीड जिल्ह्यातून ताकदीने यावे, असे आवाहन जिल्हा निरीक्षक सचिन मिसाळ यांनी म्हटले.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आदेशानुसार आणि प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांच्या नियोजनातून पुण्यात होणारा मेळावा हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा युवकांचा मेळावा ठरेल. त्याअनुषंगाने नियोजनार्थ बैठक झाली असून हा मेळावा यशस्वी करण्यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेस सज्ज आहे, अशी ग्वाही बाळा बांगर यांनी दिली. तसेच, मार्चच्या पहिल्या आठवड्यात जिल्हास्तरीय मेळावा होणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

### क वर्ग सहकारी संस्थांचे निवडणुक कार्यक्रम

**श्री एम.एल.देशपांडे निवडणुक निर्णय अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रे-२ सलग्न कार्यालय सहायक निबंधक सहकारी संस्था ता.गेवराई जि.बीड**

| अ.क्र. | संस्थेचे नाव | मतदार संघाचे नाव | नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठी शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा) | मिळालेल्या नामनिर्देशन पत्राच्या यादीच्या प्रसिध्दीचा दिनांक | नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिनांक व वेळ | छाननीनंतरच वैध नामनिर्देशन पत्राच्या यादीचा प्रसिध्दीचा दिनांक | ज्या दिनांकापर्यंत उमेदवारी मागे घेता येईल तो दिनांक व वेळ | निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांच्या अंतिम यादीची प्रसिध्दी व चिन्हाचे वाटप दिनांक व वेळ | आवश्यक असल्यास ज्या दिनांकास ज्या वेळी व ज्या ठिकाणी मतदान घेण्यात येईल तो दिनांक ती वेळ व ते ठिकाण | मतमोजणी दिनांक वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल जाहीर करण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | **खंडेश्वर** महिला **ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था म .मालेगाव बु** गेवराई ता.गेवराई जि.बीड | १) सर्वसाधारण (०६)<br>२)अनुसूचित जाती/ जमाती (०१)<br>३)महिला राखीव (०२)<br>४)इतर मागासप्रवर्ग (०१)<br>५)वि.जा./भ.ज./वि.मा.प्र. (०१)<br>एकुण (११) | दि.०७/०२/२०२४ ते दि.१३/०२/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.१३/०२/२०२४ सायं.५.०० वा. (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.१४/०२/२०२४ सकाळी ११.०० वा. पासुन छननी संपेपर्यत ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.१५/०२/२०२४ सकाळी ११.०० वा. ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.१५/०२/२०२४ ते २९/०२/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.०१/०३/२०२४ सकाळी ११.०० वा. ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.०८/०३/२०२४ रोजी स.०८.०० ते दु.४.०० वाजेपर्यत स्थळ- संस्थेचे कार्यालय | दि.०८/०३/२०२४ दु.४.३० वाजेपर्यत स्थळ- संस्थेचे कार्यालय | दि.०८/०३/२०२४ मतमोजणी नंतर लगेचच स्थळ- संस्थेचे कार्यालय |
| २ | **विग्नहर विदयार्थी ग्राहक सहकारी संस्था म .गढी ता.गेवराई जि.बीड** | १) सर्वसाधारण (०८)<br>२)अनुसूचित जाती/ जमाती (०१)<br>३)महिला राखीव (०२)<br>४)इतर मागासप्रवर्ग (०१)<br>५)वि.जा./भ.ज./वि.मा.प्र. (०१)<br>एकुण (१३) | दि.०७/०२/२०२४ ते दि.१३/०२/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.१३/०२/२०२४ सायं.५.०० वा. (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.१४/०२/२०२४ **दुपारी** १.०० वा. पासुन छननी संपेपर्यत ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.१५/०२/२०२४ सकाळी ११.०० वा. ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.१५/०२/२०२४ ते २९/०२/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.०१/०३/२०२४ सकाळी ११.०० वा. ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.०९/०३/२०२४ रोजी स.०८.०० ते दु.४.०० वाजेपर्यत स्थळ- संस्थेचे कार्यालय | दि.०९/०३/२०२४ दु.४.३० वाजेपर्यत स्थळ- संस्थेचे कार्यालय | दि.०९/०३/२०२४ मतमोजणी नंतर लगेचच स्थळ- संस्थेचे कार्यालय |

**वरील अनुसुचिमधील क्र.०३ ते ०८ मधील कामकाज निवडणुक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये होईल. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता कार्यालय, सहायक निबंधक, सहकारी संस्था ता.गेवराई , जि.बीड, छत्रपती संभाजी राजे व्यापारी संकुल, पाहिला मजला , बॅक ऑफ इंडीया व आय.सी.आय.सी.आय बॅंकेच्या शेजारी, मोंढा नाका, बीड रोड गेवराई ता.गेवराई जि.बीड असा आहे. निवडणूकी संबंधीत सर्व परीपत्रके, नियम व अनुषंगीक सुचना निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात पहावयास मिळतील. वरील अनुसुचिमधील क्र.०३, क्र.०४ व क्र.०७ मधील कामकाज शासकिय सुटीचे दिवस वगळुन होईल.**

**स्वाक्षरीत**
**(एम.एल.देशपांडे )**
**निवडणुक निर्णय अधिकारी**

### क वर्ग सहकारी संस्थांचे निवडणुक कार्यक्रम

**श्रीमती एस.एस.कदम , निवडणुक निर्णय अधिकारी तथा सहायक निबंधक कार्यालय सहायक निबंधक सहकारी संस्था ता.गेवराई जि.बीड**

| अ.क्र. | संस्थेचे नाव | मतदार संघाचे नाव | नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठी शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा) | मिळालेल्या नामनिर्देशन पत्राच्या यादीच्या प्रसिध्दीचा दिनांक | नामनिर्देशन पत्राच्या छाणनीचा दिनांक व वेळ | छाणनीनंतरच वैध नामनिर्देशन पत्राच्या यादीचा प्रसिध्दीचा दिनांक | ज्या दिनांकापर्यंत उमेदवारी मागे घेता येईल तो दिनांक व वेळ | निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांच्या अंतिम यादीची प्रसिध्दी व चिन्हाचे वाटप दिनांक व वेळ | आवश्यक असल्यास ज्या दिनांकास ज्या वेळी व ज्या ठिकाणी मतदान घेण्यात येईल तो दिनांक ती वेळ व ते ठिकाण | मतमोजणी दिनांक वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल जाहीर करण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | **अर्थक्रांती महिला नागरी सहकारी पतसंस्था म .गेवराई** ता.गेवराई जि.बीड | १) सर्वसाधारण (०६)<br>२)अनुसूचित जाती/ जमाती (०१)<br>३)महिला राखीव (०२)<br>४)इतर मागासप्रवर्ग (०१)<br>५)वि.जा./भ.ज./वि.मा.प्र. (०१)<br>एकुण (११) | दि.०७/०२/२०२४ ते दि.१३/०२/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.१३/०२/२०२४ सायं.५.०० वा. (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.१४/०२/२०२४ सकाळी ११.०० वा. पासुन छननी संपेपर्यत ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.१५/०२/२०२४ सकाळी ११.०० वा. ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.१५/०२/२०२४ ते २९/०२/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.०१/०३/२०२४ सकाळी ११.०० वा. ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.०८/०३/२०२४ रोजी स.०८.०० ते दु.४.०० वाजेपर्यत स्थळ- संस्थेचे कार्यालय | दि.०८/०३/२०२४ दु.४.३० वाजेपर्यत स्थळ- संस्थेचे कार्यालय | दि.०८/०३/२०२४ मतमोजणी नंतर लगेचच स्थळ- संस्थेचे कार्यालय |
| २ | **धनलक्ष्मी महिला नागरी सहकारी पतसंस्था म .गेवराई** ता.गेवराई जि.बीड | १) सर्वसाधारण (०६)<br>२)अनुसूचित जाती/ जमाती (०१)<br>३)महिला राखीव (०२)<br>४)इतर मागासप्रवर्ग (०१)<br>५)वि.जा./भ.ज./वि.मा.प्र. (०१)<br>एकुण (११) | दि.०७/०२/२०२४ ते दि.१३/०२/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.१३/०२/२०२४ सायं.५.०० वा. (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.१४/०२/२०२४ **दुपारी** १.०० वा. पासुन छननी संपेपर्यत ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.१५/०२/२०२४ सकाळी ११.०० वा. ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.१५/०२/२०२४ ते २९/०२/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.०१/०३/२०२४ सकाळी ११.०० वा. ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.०९/०३/२०२४ रोजी स.०८.०० ते दु.४.०० वाजेपर्यत स्थळ- संस्थेचे कार्यालय | दि.०९/०३/२०२४ दु.४.३० वाजेपर्यत स्थळ- संस्थेचे कार्यालय | दि.०९/०३/२०२४ मतमोजणी नंतर लगेचच स्थळ- संस्थेचे कार्यालय |

**वरील अनुसुचिमधील क्र.०३ ते ०८ मधील कामकाज निवडणुक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये होईल. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता कार्यालय, सहायक निबंधक, सहकारी संस्था ता.गेवराई , जि.बीड, छत्रपती संभाजी राजे व्यापारी संकुल, पाहिला मजला , बॅक ऑफ इंडीया व आय.सी.आय.सी.आय बॅंकेच्या शेजारी, मोंढा नाका, बीड रोड गेवराई ता.गेवराई जि.बीड असा आहे. निवडणूकी संबंधीत सर्व परीपत्रके, नियम व अनुषंगीक सुचना निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात पहावयास मिळतील. वरील अनुसुचिमधील क्र.०३, क्र.०४ व क्र.०७ मधील कामकाज शासकिय सुटीचे दिवस वगळुन होईल.**

**स्वाक्षरीत**
**(एस.एस.कदम)**
**निवडणुक निर्णय अधिकारी**

दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे



## पाण्यासाठी दिंद्रुड ग्रामस्थांचा तब्बल दोन तास रास्ता रोको आंदोलन

### आंदोलनाकडे लक्ष न दिल्याने संतप्त ग्रामस्थांनी अधिकारी - कर्मचाऱ्यांना पंचायत समितीत कोंडले



माजलगाव ।प्रतिनिधी

अनेक महिन्यापासून दिंद्रुड येथील नागरिकांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल होत आहेत.त्यामुळे ग्रामस्थांनी दिंद्रुडच्या रस्त्यावर दि.६ फेब्रुवारी मंगळवार रोजी दोन तास रास्ता रोको केला होता.परंतु या आंदोलनाकडे प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लक्ष न दिल्याने,संतप्त झालेल्या नागरिकांनी माजलगावच्या पंचायत समिती गाठत चक्का अधिकारी - कर्मचारी यानाच कार्यालयात कोंडले होते.

दिंद्रुड येथे जनजीवन योजनेचे काम अनेक दिवसापासून रखडले आहे. त्यात पुन्हा पाण्याची समस्या दिवसेदिवस दिवस वाढत आहे. विहिरी आटत चालल्या आहेत. बोरला पाणी येत नाही.त्यामुळे येथील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याविना मोठे हाल होत आहेत. याबाबत नागरिकांनी अनेक प्रशासकीय ठिकाणी निवेदने दिली आहेत.मात्र या मागण्यांचा काहीच उपयोग होत नसल्याने दि.६ फेब्रुवारी मंगळवार रोजी येथील नागरिकांनी रस्त्यावर ठिय्या आंदोलन केले. सुमारे दोन तास आंदोलन करूनही प्रशासकीय अधिकारी फिरकले नाहीत.यामुळे संतप्त झालेल्या दिंद्रुड येथील ग्रामस्थांनी थेट माजलगाव पंचायत समिती कार्यालय गाठत.पंचायत समिती कार्यालयाच्या मुख्य दार लावून सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना कोंडून ठेवले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाव व चिन्ह अजितदादांना, निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे परळीत जल्लोषात स्वागत

### कार्यकर्त्यांनी पेढे भरवून व फटाके फोडून केला जल्लोष



परळी ।प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, चिन्ह व नाव हे सर्वार्थाने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अधिकारात असल्याचा निर्णय आज निवडणूक आयोगाने जाहीर केला, त्यानंतर कृषिमंत्री धनंजय मुंडे यांचा मतदारसंघ असलेल्या परळी वैद्यनाथ येथे पदाधिकारी व करूकर्त्यांनीं पेढे वाटून व फटाके फोडून जल्लोष केला आहे.

सर्व कार्यकर्त्यांनी निकालाची घोषणा होताच परळी शहरातील राणी लक्ष्मीबाई टॉवर येथे एकत्रित येऊन जा जल्लोष साजरा केला. धनंजय मुंडे यांनी देखील काही वेळापूर्वी हा लोकशाहीचा विजय असुन, आपण या निर्णयाचे नम्रपणे स्वागत करतो, असे वक्तव्य केले आहे. दरम्यान परळी येथे झालेल्या जल्लोषात राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, रवींद्र परदेशी माजी उपनगरराध्यक्ष ,अनंतराव इंगळे सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष,माजी नगरसेवक रवी मुळे ,महादेव रोडे ,अनिल आष्टेकर, महेंद्र रोडे, अजिज कच्छी,केशव गायकवाड, अल्ताफ पठाण अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष भरत ताटे,राज हजारे,प्रताप समिंदरसवळे,बळीराम नागरगोजे,निलेश वाघमारे,अमर रोडे, धनराज कुरील, सुरेश नानवटे, अमोल रोडे, अमोल अवचारे, ज्ञानोबा मस्के, अजमत खासाब, जयराम पवार, विजय आटकोरे, शिवराज सुरवसे, प्रताप समिंदर सावळे, मंगेश मुंडे, बालाजी घोडके, सोमनाथ सलगरे, सनी देवडे, पंकज मुळी ,संकेत दहिवडे,सुयोग सुर्यवंशी यांसह आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## बीड तालुका खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत महायुतीचा प्रवेश ..!

### बिनविरोध निवडणुकीत भाजपाला मिळाले दोन संचालक ...!



बीड ।प्रतिनिधी

बीड तालुका खरेदी विक्री संघाच्या निवडणूकित महायुतीचा प्रयोग पुन्हा एकदा यशस्वी झाला असून, भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसंग्राम महायुतीने क्षीरसागरांच्या कायम एकहाती सत्तेत असणार्या बीड तालुका खरेदी विक्री संघात महायुतीने प्रवेश केला असून, एकूण पंधरा संचालकाच्या निवडीमध्ये महायुतीचे सहा संचालक बिनविरोध निवडून आले आहेत.

बीड तालुका मार्केट कमिटीच्या निवडणुकी पासून बीड तालुक्यातील जयदत्त क्षीरसागरांच्या प्रभावाखाली असणार्या संस्थांच्या निवडणुका बीड तालुक्यातील सर्व राजकीय पक्षांची महायुती करून लढवण्याचा प्रयोग केला. हा महायुतीचा प्रयोग तालुका मार्केट कमिटीच्या निवडणुकीमध्ये तर यशस्वी झालाच तसेच बीड तालुका खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत देखील यशस्वी झाला.राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी आ. अमरसिंह पंडित यांच्या पुढाकारातून भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेना नेते अनिल दादा जगताप, कुंडलिक खांडे, सचिन मुळूक

## बंदुकीच्या धाक दाखवून उसतोड मजूर पती-पत्नीचे अपहरण

**माजलगाव ।प्रतिनिधी**

**तालुक्यातील घळाटवाडी येथील ऊसतोड मजूर असलेल्या पती-पत्नी सह दोघांचे बंदुकीच्या धाकावर अपहरण केल्याची घटना दि ०६ फेब्रुवारी मंगळवार रोजी पहाटे २:०० वाजता घडली.यातील दोघांना सोडून दिले असून पती-पत्नी अद्यापही अपहरणकर्त्यांच्या ताब्यात आहेत.**

घळाटवाडी येथील रहिवासी असलेले संतोष रतन शिंदे यांचा मुलगा सचिन संतोष शिंदे व त्याची पत्नी चंपाबाई सचिन शिंदे हे येडेश्वरी येथील कारखान्याला उसतोडणीसाठी गेले होते.मात्र, मजुरीचे पैसे मिळाल्याने शिंदे दाम्पत्य काही दिवसांपूर्वी कारखान्याहून परत आले.दरम्यान दि ०६ फेब्रुवारी मंगळवार पहाटे २:०० वाजता दोन जीपमधून काही लोक शिंदे यांच्या घरी आले.घरात घुसून त्यांनी गोळीबार करत बंदुकीच्या धाकावर अनिल संतोष शिंदे, सचिन संतोष शिंदे , चंपाबाई सचिन शिंदे,तायाबाई शिंदे यांना जीपमध्ये टाकले.काहीवेळाने अनिल व तायाबाई यांना त्यांनी रस्त्यातच सोडून दिल्याची माहिती शिंदे यांच्या नातेवाईकांनी दिली आहे.




### माजलगाव तालुक्यातील घळाटवाडी येथील घटना

● विशेष वृत्त

शिंदे दाम्पत्य ताब्यात

सचिन व चंपाबाई शिंदे हे पती-पत्नी अद्यापही अपहरणकर्त्यांच्या ताब्यात आहेत.या घटनेने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी गावकऱ्यांनी माहिती दिल्यानंतर ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली.हा प्रकार उसतोडीतून झाला असून या ठिकाणी गोळीबार झालेला नाही व त्यांचे अपहरण झाले असे म्हणता येणार नाही अशी माहिती घटनेची माहिती ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालक कोळी यांनी दिली आहे.

## संत भाऊ - बाबा सेवा प्रतिष्ठानच्या भव्य कीर्तन महोत्सवाची उत्साहात सांगता

### गेवराईत संत भाऊ- बाबांच्या पुण्यतिथीनिमित्त हजारोंच्या संख्येने भाविकांची उपस्थिती



शेख आतिख/तलवाडा

गेवराई येथील संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या १९ व्या भव्य कीर्तन महोत्सवाची शनिवारी रोजी ह.भ.प.महंत उध्दव महाराज मंडलीक (नेवासेकर) यांच्या अमृततुल्य काल्याच्या कीर्तनाने उत्साहात सांगता झाली. दरम्यान यावेळी माऊली संस्थानचे महंत नामदेव महाराज शेकटेकर, यांच्या सह महिला तसेच पुरुष भाविकांची हजारोंच्या संख्येने उपस्थिती होती. वै.गुरुवर्य संत भगवानबाबा व वै. संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त गेवराई येथे संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानतर्फे भव्य-दिव्य अशा कीर्तन महोत्सवाचे नियोजनबद्ध आयोजन केले करण्यात आले होते. यामध्ये महिला व पुरुष भाविकांचा लक्षणीय सहभाग होता. कीर्तन महोत्सवास गुरुवार दि.२६ जानेवारी रोजी प्रारंभ झाला होता. तर कीर्तन महोत्सवात महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकारांची कीर्तन सेवा झाली तर शनिवार दि.३ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.महंत उध्दव महाराज मंडलीक (नेवासेकर) यांचे अमृततुल्य काल्याच्या कीर्तनाने उत्साहात सांगता झाली. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. तर या भव्य कीर्तन महोत्सव काळात महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रातील मान्यवर, संत महंत तसेच गायक - वादक, टाळकरी हार्मोनियम वादक,विणेकरी, चोपदार आदि गुणीजन वृंद उपस्थित होते. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे,सचिव शिवाजी ढाकणे, उपाध्यक्ष मुरलीधर शेंडेकर, कोषाध्यक्ष भास्करआण्णा ढाकणे, सह कोषाध्यक्ष किशोर जवकर, कार्याध्यक्ष गोपीनाथ घुले, विश्वस्त डॉ.सुभाष ढाकणे, बापुराव घुले अर्जुन बारगजे, उद्धव ढोक, प्रविणआप्पा फुलशंकर, परमेश्वर अंतरकर सह आदी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.




## लोकनेते स्व .विनायकराव मेटे यांनी दिलेले शब्द पूर्ण करण्यासाठी कटीबद्ध - डॉ.ज्योतीताई मेटे

बीड ।प्रतिनिधी

लोकनेते स्व .विनायकराव मेटे साहेब यांनी नेहमी विकासाच्या दृष्टीने बीडसाठी निधी आणण्याचे काम केले. लोकनेते स्व. विनायकराव मेटे साहेब यांच्या प्रयत्नाने बीड शहरातील तसेच महाराष्ट्रातील विकास कामे पूर्ण झाली आहेत. रामा ५६ ते सफेपुर दहिवंडी सावरगाव घाट सात्रा जेबापिंप्री , रामा ६४ वर रस्ता सुधारणा करणे तसेच विविध विकास कामांचे भुमिपूजन सोहळा ०५ फेब्रुवारी रविवार रोजी ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे, ह. भ. प हरिहर महाराज भारती यांच्या हस्ते व डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी श्री बंकटस्वामी मठाचे मठाधिपती ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे, ह. भ. प हरिहर महाराज भारती, शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष नारायण काशीद, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, तालुकाध्यक्ष नवनाथ प्रभाळे, शिवसंग्रामचे कार्यकर्ते, पदाधिकारी आणि परिसरातील नागरिक ,भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुढ आवाजाने बीड हादरले

संभाजी लांडे ।वडवणी

बीड व वडवणी शहरात अनेक भागात मंगळवारी दि.(६) रात्री ८ वाजून २० मिनिटांनी गुढ आवाज झाला. अचानक आलेल्या आवाजामुळे नागरिक व लहान बालके भयभीत झाली. जिल्ह्यात यापूर्वी अनेक वेळा गुढ आवाज झाले आहेत दरम्यान बीड व वडवणी शहरांमध्ये मंगळवारी रात्री ८ वाजून वीस मिनिटांनी मोठा आवाज झाला. त्यामुळे खिडक्या, दरवाजे हादरली व भांडी पडली. बीडचे तहसीलदार सुहास हजारे यांनी सांगितले की हा आवाज झाल्यानंतर आम्ही राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन

विभागाशी संपर्क केला असता भुगर्भ शास्त्रज्ञ रोहन पवार म्हणाले, की हा आवाज भूकंपाचा नाही. त्यामुळे कुणी घाबरून जाण्याची गरज नाही भूगर्भातील पाण्याची पातळी कमी झाल्यानंतर एक पोकळी निर्माण होते. त्यात हवेचा दाब तयार झाल्यानंतर असे आवाज जमिनीतून येतात असे त्यांनी सांगितले.

## ग्रामीण भागातील विकासासाठी निधी खेचून आनु - राजेंद्र मस्के

### उमरद खा. येथे विकास कामाचे लोकार्पण संपन्न ..!

**बीड ।प्रतिनिधी**

**देशामध्ये नरेंद्र मोदिजींच्या नेतृत्वाखाली गतिमान विकासाची कामे चालू आहेत. राज्यात भारतीय जनता पार्टीचे मजबूत सरकार असून, ग्रामीण भागातील विकास कामासाठी अनेक योजना राबवल्या जात असून, त्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचल्या पाहिजेत**

यासाठी कटीबद्ध राहून विकास कामासाठी निधी खेचून आणू असे मत भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी उमरद खालसा येथील विकास कामाचे लोकार्पण सोहळा दरम्यान व्यक्त केले.

बीड विधानसभा मतदारसंघातील मौजे उमरद खालसा येथे बीड जिल्हा नियोजन योजने अंतर्गत नवीन शाळा खोली बांधकाम (१० लक्ष) व वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना अंतर्गत सिमेंट रस्ता(२०लक्ष) चा भव्य लोकार्पण सोहळा आज भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते संपन्न झाला.



यावेळी विधानसभा विस्तारक, शांतीनाथ डोरले, दुष्यंत नाना डोंगरे, सरपंच गणेश घोडे, सरपंच गोरख शिंदे, सरपंच दादासाहेब खिडंकर, विलास महाराज आमटे, आत्माराम जाधव, उपसरपंच गणेश लांडे, सचिन जाधव, प्रशांत जाधव, भागवत




**कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेचे एक रोपटे आपल्या बीड शहरांत कनकालेश्वर विद्यालयाच्या रूपाने बहरत आहे.. शाळेसाठी पक्की इमारत बांधण्यात येणार आहे.. या इमारतीचे काम संस्था व लोकवर्गानीतून होणार आहे.. याचे भूमिपूजन काल संस्थेचे सदस्य आ.रोहित दादा पवार व आ. संदीप भैय्या क्षीरसागर यांच्या हस्ते संपन्न झाले... आम्ही या शाळेचे माजी विद्यार्थी.. या नात्याने १९९८ च्या दहावीच्या बॅच च्या विद्यार्थ्यांनी एकत्र येत या नूतन इमारत कामासाठी रोख रक्कम १५००० रुपये रोहित दादा पवार यांच्या कडे सुपूर्द केली... यावेळी आपले वर्ग मित्र पंकज कुटे, मंगेश झरकर, विनोद बेद्रे, परसराम जाधव, नागेश पवार, शक्ती मेहरकर, मुखीद शेख आदी उपस्थित होते.**

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra).
Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com,
epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com